पुस्तकाचे नाव - कुटुंबवत्सल याने आपल्या आयुष्याची सांगितलेली संक्षिप्त हकीकत

लेखकाचे नाव - अज्ञात

प्रकाशक - हिंदु युनियन क्लब,गणपत कृष्णाजी यांचा छापखाना, मुंबई

प्रकाशन वर्ष - १८९२

किंमत - २ आणे

पृष्ठसंख्या - २९

सारांश -

फ्रेझर्स मॅगझिन या इंग्रजी मासिकाच्या जुलै १८७६ च्या अंकात एका ब्रिटीश व्यक्तीने आपल्या आयुष्याच्या दिलेल्या संक्षिप्त हकीकताचे हे मराठी भाषांतर आहे. मद्य मांस वर्ज्य करून तसेच व्यवस्थितपणा, काटकसर इत्यादी गुणांचा अवलंब करून यशस्वी झालेल्या कष्टाळू व्यक्तीची ही कहाणी आहे. वाचकांना दुर्गुणांपासून दूर वळवणारी व बोधपर अशी ही कृती आहे.

शीर्षकपानाची प्रतिकृती



...जीं जुन्या कप-
...वेळेस अंगांत
... त्यांत मद्य

# कुटुंबवत्सल.

इंग्लंड देशाच्या उत्तरेस एका लहान गांवीं माझा
...झाला असून माझें वय आज नाहीं ह्मटलें तरी स-
...साठ पासष्ट वर्षांचें आहे. माझे केंस बहुतेक पिकले
आहेत. तरी एखाद्या ज्वान पुरुषाच्यानें देखील माझा व
धरवणार नाहीं. माझा बाप धर्मोपदेशकाचा धंदा करीत
असे. त्याला एकंदर बारा मुलें झालीं आणि त्यांत सर्वांत मी
वडील. आह्मी मोठे कुलीन व घरंदाज अशी आमची पुष्क-
ळ दिवसांपासून प्रसिद्धि असे. तरी माझ्या बापाची मिळकत
... कमी व ... मुलांचा बराच सुकाळ, यामुळें
... वडील मुलांस लहानपणींच घर सोडून पोटाच्या मागें
... जाणें भाग पडलें. मला थोडेंसें लिहितां
... येत असे; ... जवळच एक मोठें व्यापाराचें
... होतें तेथें एका पेढीवर मला कारकुनाची लहानशी
...क जागा मिळाली. यावेळेस माझें वय केवळ चौदा वर्षां-
... होतें. पहिल्यानें इकडे मला पगार वगैरे कांहीं मिळत
व्हता. पेढीवर एक मुनीम असे त्याच्या घरीं दोन वेळ
...वें आणि सांगितलेली चाकरी करावी. अशा रीतीनें मी
...सरी तीन वर्षें काढलीं. नंतर माझी हुशारी व प्रामाणिक-
पणा हीं धन्याच्या नजरेस येऊन त्यानें मला महिना
...स रुपयांप्रमाणें पगार सुरू केला. याशिवाय दुपारच्या
...ळेस सर्वांबरोबर लागेल तेवढें फराळाचें सामान मिळत